# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.07.2025** **वार- गुरुवार**

---

**स्वच्छता**

केंद्र सरकारकडून दरवर्षी संपूर्ण देशभरात राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४ या राष्ट्रीय स्वच्छता स्पर्धेमध्ये, पिंपरी-चिंचवड शहरानं देशात सातवा क्रमांक तर राज्यात सर्वप्रथम क्रमांकाबरोबरच सेवन स्टार गार्बेज फ्री सिटी आणि वॉटर प्लस हे मानांकन पुन्हा एकदा मिळवलं आहे. गेल्या वर्षी स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये पिंपरी चिंचवड शहराला देशात तेरावा तर राज्यात तिसरा क्रमांक मिळाला होता. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयामार्फत दरवर्षी शहरांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नागरिक सहभाग, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, शौचालयं आणि मलनिःस्सारण व्यवस्थेचं मूल्यांकन केलं जातं. २०२४ च्या या स्पर्धेमध्ये पाच हजारपेक्षा अधिक शहरांनी भाग घेतला, महानगरपालिकेच्या विविध उपाययोजनांमुळं संपूर्ण शहरात कचऱ्याचं योग्य प्रकारे संकलन, वर्गीकरण, पुनर्वापर आणि विल्हेवाट लावण्याचं कार्य नियमितपणे केलं जात आहे. प्रत्येक प्रभागात घराघरातून ओला आणि सुका कचरा वेगवेगळा संकलित केला जातो. स्रोताजवळ प्रक्रिया केंद्रं, कंपोस्टिंग, रिसायकलिंग प्लांट, बायोगॅस यंत्रणा आदींचा वापर केला जात आहे. यामुळं शहराला सेवन स्टार कचरामुक्त शहर हे मानांकन मिळाल्याचं पालिका आयुक्त शेखरसिंह यांनी सांगितलं.

**क्षयरोग**

क्षय रुग्णांची संख्या कमी करणं आणि क्षय रुग्णांवर यशस्वी उपचार करून त्यांना बरं करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येतात. सध्या राज्यात 2 लाख 29 हजार 463 क्षयरुग्ण आहेत. 2023 मध्ये 7 हजारानं कमी झालेली ही संख्या 2024 मध्ये पुन्हा 7 हजारानं वाढली आहे. राज्यासह देशातून या आजाराला हद्दपार करण्यासाठी युद्धपातळीवरून प्रयत्न सुरू आहेत. असंख्य रुग्ण नियमित उपचारानं बरेही झालेले आहेत. राज्यातील प्रत्येक गावापासून ते शहर स्तरावर क्षयरुग्णांचा शोध घेतला जातो. विशिष्ट काळापेक्षा अधिक दिवस खोकला असेल तर अशा रुग्णांच्या थुंकीची तपासणी केली जाते. त्या तपासणीच्या अहवालातून क्षयरुग्ण असल्याचं स्पष्ट झाल्यास त्याचं समुपदेशन करून उपचाराला सुरुवात केली जाते. रुग्ण

शोधण्यासाठी शासनाच्या आरोग्य विभागासह जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचीही मदत घेतली जाते. गावपातळीवर रुग्णाचा शोध घेण्यासाठी आशा कार्यकर्त्या काम करत आहेत असं पुणे क्षयरोग विभागानं म्हटलं आहे.

**आराखडा**

पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ३२ गावांपैकी प्रत्येक गावाचा प्राथमिक नियोजन आराखडा करण्यात येणार आहे. या गावात विकास कामं करण्यासाठी इथल्या ग्रामस्थांकडून केली जाणारी मागणी आणि महापालिकेचं नियोजन यामध्ये संभ्रम असल्यानं हा निर्णय घेण्यात आल्याचं पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितलं. पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांतील विकास कामांसंदर्भात राज्य सरकारनं नियुक्त केलेल्या प्रतिनिधींची बैठक आज महापालिकेत झाली. या बैठकीला समितीचे सदस्य, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी, ओमप्रकाश दिवटे तसंच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

**महिला**

डॉक्टर सुधा कोठारी यांच्या चैतन्य संस्थेच्यावतीनं "एकल महिला शिबिराचं आज आयोजन करण्यात आलं. या शिबिराला पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी भेट देऊन एकल महिलांशी संवाद साधला. यावेळी पाटील यांनी एकल महिलांच्या समस्या, सामाजिक अडचणी आणि त्यांचा संघर्ष समजून घेतला. यासोबतच, एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी बनवण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेतर्फे विविध योजनांचा लाभ कसा मिळवून देता येईल याबाबतही सकारात्मक विचार मांडले. तसंच एकल महिलांच्या समस्यांवर ठोस उपाय योजना करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीनं आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील, असंही यावेळी सांगितलं.

**सीडबॉल**

फर्ग्युसन महाविद्यालयातील पर्यावरण संवर्धन समितीच्या वतीनं आज बीजगोळे तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कडुनिंब, फणस, जांभूळ, चिंच, आंबा, लिची, तुळशी, शिकेकाई, रिठा, अशा विविध प्रजातीच्या बियांचं संकलन करून या कार्यशाळेत 200 पेक्षा अधिक बीजगोळे तयार केले. अशा पद्धतीनं तयार केलेल्या बियांचं रोपण विद्यार्थी फर्ग्युसन टेकडीवर करणार आहेत.

**लुबाड**

सरकारी नोकरीचं आमिष दाखवून महिलांची लुबाडणूक करण्याची घटना पुण्यात उजेडात आली आहे. दोन महिलांना सरकारी नोकरी देण्याच्या नावाखाली त्यांची ३० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस याचा अधिक तपास करत असून पैशाची मागणी करणाऱ्या कोणावरही विश्वास ठेवू नका असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**कबड्डी**

म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात महाराष्ट्र राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेबरोबरच पुणे जिल्हा कबड्डी लीग स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत पुरुष विभागात झुंजार खेड संघानं शिवनेरी जुन्नर संघावर ३८-३७ असा निसटता विजय मिळविला. आदील गोरे आणि सौरभ वडे यांनी चौफेर चढाया करत संघाचा विजय साकार केला. महिला विभागात वैभवी जाधव आणि वर्षा बनसोडे यांनी घेतलेल्या पकडीच्या जोरावर बलाढ्य बारामती संघानं झुंजार खेड संघावर ४२-२३ गुणांनी विजय मिळवून स्पर्धेतील पहिला विजय नोंदविला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**